# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: dhepune@yahoo.co.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स

०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/एकलव्य/नविन मंजूरी/२०१५-१६/१४अई | 7555 दि. २७/०७/२०१५ 28 JUL 2015

परिपत्रक :-

प्रति,

विभागीय शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण ,
पुणे/मुंबई/कोल्हापूर/ औरंगाबाद/ नागपूर/ नांदेड/
जळगांव/अमरावती/ पनवेल/ सोलापूर.

विषय : पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांनी एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी आवेदनपत्रे सादर करणेबाबत.
नवीन मंजूरी/नूतनीकरण सन २०१५-२०१६.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.एससीएच/१०१५/८१/मशि-४, दि.७ फेब्रुवारी,१९९६.

संदर्भांकित शासन निर्णयान्वये कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या विद्याशाखांच्या अतंर्गत पदव्युत्तर शिक्षण घेणा-या आणि विहित अटी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने सन १९९५-९६ या वर्षापासून एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे.

२/-आपल्या कार्यक्षेत्रातंर्गत सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०/०९/२०१५ अखेरपर्यंत विहित नमुन्यात अचुक व परिपुर्ण भरलेली आवेदनपत्रे सहपत्रासह मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव स्विकारण्याचा अंतिम दि.३०.९.२०१५ असून त्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

३/- एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी पात्रतेच्या प्रमूख अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. पदवी परीक्षेत विज्ञान शाखेत किमान ७० टक्के गुण, तर कला, वाणिज्य, विधी शाखेत किमान ६० टक्के गुण मिळविलेले असावेत. (शासनाकडून प्राप्त आर्थिक तरतूदीनुसार गुणानुक्रमे जास्त गुणानुसार अर्जाचा विचार करण्यात येईल).

२. संबंधित विद्यार्थ्यांचे व त्याच्या आई-वडिलांचे/पालकांचे सर्व मार्गानी मिळून मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/ पेक्षा अधिक नसावे.

३. पदव्युत्तर द्वितीय वर्षासाठी आर्थिक सहाय्याचे नुतनीकरण मंजूर करण्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे,व वार्षिक ७५ टक्के नियमित उपस्थिती आवश्यक आहे. चांगली वर्तणूक असणे आवश्यक आहे. याबाबत प्रचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांचे सुस्पष्ट प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या व ए.टी.के.टी मिळालेल्या विद्यार्थ्यांना नुतनीकरण मंजूर करता येत नाही. याची कृपया नोंद घ्यावी

तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या आर्थिक तरतूदीच्या आधीन राहून गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे संबंधित विद्यापीठनिहाय मंजूरी देण्यात येईल.

४. हया योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना रु.५०००/ प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

५.एकलव्य आर्थिक सहाय्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले नविन मंजूरीचे आवेदनपत्रे विद्यापीठे/महाविद्यालये यांनी त्यांचे स्तरावर जबाबदारीने तपासून न पाहता पाठविली जातात असे संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे म्हणून पात्र विद्यार्थ्यांना एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी अडचणी निर्माण होतात व कार्यालयाचा वेळ खर्च होतो. विद्यार्थ्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यास विलंब होऊ नये किंवा विद्यार्थी आर्थिक सहाय्यापासून वंचित राहू नये म्हणून नविन मंजूरीचा प्रस्ताव सोबत दिलेल्या सूचनाप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालये यांनी प्रथम त्यांचे स्तरावर अर्ज तपासूनच अंतिम मंजूरीसाठी या संचालनालयाकडे दिलेल्या विहित मुदतीतच पाठविण्यात यावेत. लाभार्थी विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरावीत म्हणून सदरचे परिपत्रकांची प्रत फलकावर लावावी. तसेच सदरचे प्रस्ताव हे फक्त विद्यापीठे / महाविद्यालयामार्फतच स्विकारुन विचारात घेतले जातील.

६. अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी त्याचा सद्याचा स्वतःचा सुरु असलेला खाते क्रमांक, बँकेचा संपूणे पत्ता, बँक शाखा, कोड नंबर, आयएफएससी कोड, तसेच बँकेचा एमआय सीआर कोड, विद्यार्थ्यांचा दूरध्रमण क्रमांक, इत्यादी माहिती बिनचूकपणे अर्जात नमूद करावी.

८. विद्यार्थ्यांने बँक खातेच्या पासबुकाची पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

(डॉ. वि.रा. मोरे)
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१**

**प्रतः** कुलसचिव, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail:
dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स
०२०/२६१२११५३

क्र.उशिसं/अहिंदी/नमं/२०१५-१६/१४अई / 7555 दि. २७/०७/२०१५ 28 JUL 2015

परिपत्रक :-

प्रति,

विभागीय शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण ,
पुणे/मुंबई/कोल्हापूर/ औरंगाबाद/ नागपूर/ नांदेड/
जळगांव/अमरावती/ पनवेल/ सोलापूर.

विषय : अहिंदी भाषिक राज्यातील अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेत्तर अभ्यासक्रमासाठी देण्यात येणारी हिंदी शिष्यवृत्ती.
नवीन मंजूरी/नूतनीकरण सन २०१५-२०१६.

अहिंदी भाषिक राज्यातील हिंदीचा अभ्यास करणा-या अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून हिंदी शिष्यवृत्ती योजना असून सदर शिष्यवृत्ती या संचालनालयाच्या स्तरावरुन मंजूर केली जाते.
सन २०१५-१६ या वर्षाकरिता अहिंदी भाषिक विद्यार्थ्यांनाकडून हिंदी शिष्यवृत्तीसाठी आवेदनपत्रे भरुन या संचालनालयास पाठविण्यात यावीत. आवेदनपत्रामध्ये खालील अटीची पूर्तता करण्यात यावी.

१. विद्यार्थ्यांची मातृभाषा हिंदी नसावी.

२. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा मूळचा रहिवासी असावा.

३. विद्यार्थ्यांने ज्या शाखेत प्रवेश घेतला असेल तो रुजू अहवाल आवश्यक असून त्यामध्ये विद्यार्थ्यांने हिंदी विषय घेणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांला इ.१०वी/इ.१२/ वीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण व हिंदी विषयात किमान ६५ टक्के पेक्षा जास्त गुण असणा-याचेच आवेदनपत्रे पाठवावेत.

५. इ.११वीच्या शिष्यवृत्तीकरिता इ.१० वी मार्च २०१५ ची साक्षांकित केलेली गुणपत्रिका व बी.ए.प्रथम वर्षाच्या शिष्यवृत्तीकरिता इ.१२ वी मार्च २०१५ ची सांक्षांकित केलेली गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.

६. एम.ए.प्रथम वर्षाच्या शिष्यवृत्तीकरिता बी.ए.तृतीय वर्ष परीक्षेच्या साक्षांकित केलेली गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे.

७. अर्ज परिपूर्ण व बिनचूक भरलेला आवश्यक आहे. अपूर्ण अर्जाचा व विहित मुदतीत न आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

नुतनीकरणाचा प्रस्ताव पाठवितांना विद्यार्थ्यांला मागील वर्षाच्या अंतिम परीक्षेत किमान ५० टक्के पेक्षा जास्त गुण आवश्यक आहे व विद्यार्थ्यांने हिंदी विषय घेतलेला असवा. तसेच वार्षिक प्रगती अहवालामध्ये गतवर्षीमध्ये नुतनीकरणाचा फोलिओ क्रमांक व आदेश क्रमांक, दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. नविन मंजूरीकरिता नविन मंजूरीचाच अर्ज व नुतनीकरणकरिता वार्षिक प्रगती अहवाल भरणे आवश्यक आहे.

हिंदी शिष्यवृत्तीसाठी एकूण २५५ संच मंजूर असून संचाच्या अधीन राहून गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या अर्जात उणीवा आढळून आल्यास व उणीवांची पूर्तता त्याच आर्थिक

वर्षात न केल्यास अर्ज अपात्र समजण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांवर राहील यांची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना इतर शिष्यवृत्ती मंजूर झालेली नसेल याची खात्री करण्यात यावी. कारण प्रचलित नियमानुसार एका वेळी एकच शिष्यवृत्तीचा लाभ घेता येतो.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत बँक खाते उघडणे बंधनकारक असून, विद्यार्थ्यांनी त्याचा सद्याचा स्वतःहाचा सुरु असलेला खाते क्रमांक, बँकेचा संपूर्ण पत्ता, बँक शाखा कोड नंबर आयएफएससी कोड तसेच बँकेचा एमआय सीआर कोड आधार कार्ड क्रमांक, दूरभ्रमण क्रमांक, इत्यादी माहिती बिनचूकपूणे अर्जात नमूद करावी. तसेच विद्यार्थ्यांने बँक खातेच्या पासबुकाची पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स अर्जासोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी हिंदी शिष्यवृत्तीचे आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरुन या संचालनालयात दि.३०.०९.२०१५ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. अपूर्ण व चुकीची माहिती असलेली आवेदनपत्रे तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत अशा स्पष्ट सूचना महाविद्यालयांना देण्यात याव्यात. दि.३०.९.२०१५ नंतर प्राप्त झालेले नविन मंजूरी/नुतनीकरणाचे प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

**(डॉ. वि. रा. मोरे)**
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१

प्रत : कुलसचिव, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे,यांना माहिती व कार्यावाहीसाठी.